सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.daininktarunbharat.com
10 Oct 2024 - Page 2



# सेवासदन प्रशालेत सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम

**सोलापूर, दि. ९ ऑक्टोबर-** पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल व क्विक हील फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाम ध्ये संगणक शास्त्र संकुलातील सायली शेळके व मालती जाधव या विद्यार्थिनींनी सायबर शिक्षा फार सायबर सुरक्षाया विषयावर व्याख्यान दिले.

यामध्ये त्यांनी आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल उदाहरणाद्वारे माहिती दिली. अशा फसवणुकी पासून आपण कसे दूर राहावे व कशाप्रकारे काळजी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन केले. ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करून घेणे, व्हाट्सअप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्रॉंग वापरून आपली माहिती सुरक्षित करावी तसेच आपली माहिती ही आपली जबाबदारी आहे असे सांगितले. मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा असे आवर्जून सांगितले. कार्यक्रमास एकूण २६० विद्यार्थिनी व सेवासदन प्रशालेच्या मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका बारभाई नंदिनी, तसेच पर्यवेक्षिका स्वाती पोतदार उपस्थित होते. सहशिक्षिका प्रणोती रायखेलकर यांनी आभार मानले.